एन.ए. ३४३/१

वाचाः-१. शासन निर्णय महसुल व वन विभाग क्रमांक एनएपी-२०१६/प्र.क्र. ७/टी-१/ मंत्रालय मुंबई दिनांक २२/०१/२०१६.

२. अतिरिक्त नियोजन अधिकारी नगर रचना सिडको वाळुज महानगर, औरंगाबाद यांचे प्रत्र क्र. CIDCO/ATPO/BP/AUR(WLJ)/2020(LP)/25 दिनांक १०/०१/२०२०.

३. अर्जदार श्री. निनाद नरेंद्र खोचे व सौ. सुनिता भानुदासराव जोशी यांचा अर्ज

.....................................................................................

जा.क्र. -२०२०/ एनए/ गंगापूर/ परवानगी 363 दिनांकः 29/7/2020

**परिशिष्ट ब**

**महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ च्या कलम-४२ अ मधील तरतुदी अन्वये नियोजन प्राधिकरण बांधकाम/विकास परवानगी दिली आहे अशा जमीनीच्या भोगवटादारास द्यावयाची सनद.**

ज्याअर्थी जिल्हा औरंगाबाद तालुका गंगापूर मौजे वाळुज (बु) च्या सर्व्हे क्रं./गट क्रं./ न.भु.क्रं. ३४३/१ (पैकी) मधील रेखांकनाचे क्षेत्र ६४९२४.२२ चौ.मी पैकी मंजूर अभिन्यासाचे क्षेत्र ३४५३४.०७ चौ.मी. या जमीनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ च्या कलम ४२-अ च्या तरतुदींन्वये मौजे वाळुज (बु) १) निवासीसाठी क्षेत्र २२३६९.२९ चौ.मी. २) शैक्षणिक (प्रायमरी व सेंकडरी स्कुल व खेळाचे मैदान) यासाठी क्षेत्र १०६१३.४१ चौ.मी., ३) वाणिज्य (भाजीपाला बाजारपेठ व दवाखाण्यासाठी) क्षेत्र १५५१.३७ चौ.मी. अन्य अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमीनीचा विकास करण्यास अतिरिक्त नियोजन अधिकारी नगर रचना सिडको वाळुज महानगर यांचे पत्र क्रं. CIDCO/ATPO/BP/AUR(WLJ)/2020(LP)/25 दिनांक १०/०१/२०२० अन्वये विकास/बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे. ज्या संबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजुर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे.

ज्याअर्थी उक्त जमीनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम ४७-अ नुसार देय रूपांतर कराची वर नमुद अकृषीक प्रयोजनार्थ वापरापोटी अकारणीची रक्कम चालन क्रं. MH002686820202021M रक्कम रूपये ५८९३०/- (अठ्ठावन्न हजार नऊशे तीस फक्त) दिनांक २८/०७/२०२० रोजी भरणा केली आहे.

त्या अर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधीन राहुन उपरोक्त जमीनीच्या भोगवटादारास सदर नियोजन प्राधिकाधिकाऱ्याच्या वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमीनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम ४२-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

१. आकारणी : उक्त जमीनीचा भोगवटादार उक्त जमीनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणीऐवजी वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासुन दिनांक ३१ जुलै (वर्ष) रोजी संपणाऱ्या हमींच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी मंजूर दराने परिगणीत होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकारी यांचेकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल, अशी सुधारीत आकारणी देईल.

२. उक्त जमीनीचा भोगवटादार उक्त जमीनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.

३. वरिल मंजुर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मंजुरीशिवाय कोणताही बदल करू नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मान्यतेने सदर जमीनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडुन मंजुर झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटदारावर बंधनकारक राहील.

४. उक्त जमीनीच्या भोगवटदाराने पुर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्या जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्य आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींअन्वये जी करण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीत बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९ च्या पोट कलम (२) च्या अधीनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीनी भोगवटादार याच्या वहिवाटीत असल्याचे चालु ठेवता येईल.

त्याची साक्ष म्हणुन ~~अप्पर~~ तहसिलदार, ता. गंगापूर,जि. औरंगाबाद या ठिकाणी महाराष्ट्र राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुद्धा त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

१. श्री. निनाद नरेंद्र खोचे

२. सौ. सुनीता भानुदासराव जोशी

सौ. सुनीता भानुदासराव जोशी

साक्षीदारांच्या सह्या व पदनामे

१. ॲड. भानुदास जोशी गंगापूर

२. प्रशांत भानुदासराव जोशी गंगापूर

आम्ही जाहीर करतो की, ज्याने या सनदेवर स्वतः म्हणुन स्वाक्षरी केलेली आहे ती, श्री. निनाद नरेंद्र खोचे व सौ. सुनिता भानुदासराव जोशी व्यक्ती तीच व्यक्ती आहे आणि या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

साक्षीदारांच्या सह्या व पदनामे

१. ॲड. भानुदास जोशी, गंगापूर

२. प्रशांत भानुदासराव जोशी

तहसिलदार, गंगापूर
तहसिलदार, गंगापूर

प्रतिलीपी :- (माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव)

१. मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. अतिरिक्त नियोजन अधिकारी नगर रचना सिडको वाळुज महानगर, औरंगाबाद.
३. मा. उपविभागीय अधिकारी, वैजापूर.
४. मा. अधिक्षक, भुमि अभिलेख, औरंगाबाद.
५. मा. नगर भुमापन अधिकारी, औरंगाबाद
६. अर्जदार श्री. निनाद नरेंद्र खोचे व सौ. सुनीता भानुदासराव जोशी रा. ता.जि. औरंगाबाद.
७. तलाठी साझा वाळुज (बु), ता. गंगापूर, जि. औरंगाबाद.

तहसिलदार, गंगापूर
तहसिलदार, गंगापूर